(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

**June -2020**

**ISSUE No-CCXXXV(235)**




**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor :
Director
Aadhar Social Research &,
Development Training Institute,
Amravati.

**Dr. R.S.Satbhai**
Executive Editor
Local Secretary
Adv.B.D.Hambarde Mahavidyalaya
Ashti

**Guest Editor**

**Dr. S.R.Nimbore**
Principal
Adv.B.D.Hambarde
Mahavidyalaya Ashti

**Dr. Satish Kadam**
President,AMIP&
Head,Dept of History
YCM,Tuljapur

**Dr. Shivraj Bokade**
Secretary,AMIP&
Head,Dept of History
YC,Nanded

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

International Impact Factor Services (IIFS)

S.P. Mahavidyalaya Bhoom
Bhoom
Tq.Bhoom Dist.O'bad

| | | |
|---|---|---|
| 192 | बाल्यावस्थेतील बालकांवर जंक फुडचा होणारा परिणाम — प्रा. डॉ. पुनम देशमुख | 855 |
| 193 | उत्तरपथ आणि दक्षिणपथ जोडणारी पुरातत्त्विय स्थळे — रश्मी भिरूड | 858 |
| 194 | डॉ.राममनोहर लोहियांचे राजकीय अर्थशास्त्रीय विचार — ए. एम. देशमुख | 864 |
| 195 | श्रीलक्ष्मी त्रिविक्रमेश्वर मंदिर स्थापत्य:एक अभ्यास — प्राचार्य डॉ. अरुण दळवे | 870 |
| 196 | मराठा साम्राज्यातील महिलांचे स्थान — डॉ. कमलाकर गोरख घोलप | 874 |
| 197 | नाथ संप्रदायाचा उदय व कार्य — प्रोफेसर, डॉ. किशोरकुमार गव्हाणे | 882 |
| 198 | गोदाकाठावरील लिंबगावचे रामेश्वर मंदिरस्थापत्य: एक अभ्यास — डॉ. बबन श्रीकृष्ण मस्के | 887 |
| 199 | माणकेश्वरचे मूर्तिशिल्प व अवशेष (ता. जिंतूर जि.परभणी) — प्रा. डॉ. राऊत उध्दव उमाजी | 891 |
| 200 | विदर्भातील बंजारा समाज व संस्कृती — डॉ. विपिन राठोड | 894 |
| 201 | आदिवासी जमातीवर जागतिकीकरणाचा प्रभाव — डॉ. हेमलता यु मु | 898 |
| 202 | शिवरायांचे कृषी विषयक धोरण — डॉ. सुवर्णा भाऊसाहेब पाटील | 902 |
| 203 | नाट्यसंगीत– शास्त्रीय संगीताच्या प्रचार प्रसाराचे प्रभावी माध्यम — डॉ. अर्चना सं. देशपांडे | 905 |
| 204 | मराठी विज्ञानकथा : स्वरूप व विशेष — डॉ . शिवाजी विष्णू पाटील | 909 |
| 205 | सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा जोतीराव फुले — श्री. अजितकुमार भिमराव पाटील. | 914 |
| 206 | सामाजिक सुधारणांचे प्रवर्तक रू महात्मा फुले — डॉ. विन्सेंट कैतान डिमेलो | 919 |
| 207 | वरोरा, भद्रावती, तालुक्यातील ऐतिहासीक स्थळे व विकासाच्या दिशा — प्रा. डॉ. दीपक पां. लोणकर | 925 |
| 208 | बुलडाणा जिल्ह्यातील मराठा शैक्षणिक व सामाजिक सुधारणा चळवळ इ.स.१९१५ ते १९३५ — डॉ. किशोर मारोती वानखडे | 933 |
| 209 | १९ व्या शतकातील प्रबोधन चळवळीची प्रासंगिकता — प्रा.डॉ.रामभाऊ मुटकुळे/ प्रवीण सुदाम शेळके | 939 |
| 210 | शहाजीराजेंचे निजामशाहीशी असलेले सहसंबंधाचे अवलोकन — अमोल अंकुशराव मिठे / प्राचार्य डॉ.आर.एस.फुत्रे | 941 |
| 211 | भारतीय समाजातील बौध्द तत्वज्ञान :एक अभ्यास — प्रा.डॉ.प्रकाश फड | 944 |
| 212 | मृणाल गोरे यांचे स्त्री सुधारणा विषयक कायरू एक ऐतिहासिक परिशीलन — प्रा.राजेश मधुकर बाराते | 949 |
| 213 | मध्यप्रदेश के मध्य नर्मदा क्षेत्र मे व्यापारिक दृष्टिकोण से रेल मार्गो का अध्ययन (आजादी के पश्चात) — विनोद राय | 952 |




Mahavidyalaya S.P. Bhoom Tq.Bhoom Dist.O.bad

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308 June 2020

Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue No,235

# नाथ संप्रदायाचा उदय व कार्य

प्रोफेसर, डॉ. किशोरकुमार गव्हाणे

इतिहास/ विभाग प्रमुख एस. पी. कॉलेज, भूम

**प्रस्तावना –** मानवी जीवनात ईश्वर, धर्म या संकल्पना जिव्हाळ्याच्या आहेत. म्हणून भारतात प्राचीन काळापासून सगुण निर्गुण अशा ईश्वराची उपासना केली जात आहे. हिंदू धर्मात मुक्तीसाठी जे मार्ग शोधले गेले त्यांत मुख्यत: कर्ममार्ग, ज्ञानमार्ग आणि भक्तीमार्गाचा समावेश होतो. ईश्वराबद्दलचे प्रेम म्हणजेच भक्ती होय. ईश्वराची उपासना करण्यासाठी स्वीकारलेला आचारमार्ग म्हणजेच भक्ती मार्ग होय किंवा पुण्य संपादण्यासाठी, मोक्ष प्राप्तीसाठी ईश्वर उपासनेचा आचारलेला मार्ग म्हणजे देखील भक्तीमार्ग म्हटले जाते. ईश्वर प्राप्तीचे भक्ती हे साधन मानले जाते. भक्तीचा उगम वेदात असून तिचा विकास महाकाव्य व पुराणात झाला. सुरूवातीला भक्तीपंथ हा शिव आणि विष्णू या दोन देवताभोवती केंद्रीत झाला होता. नंतर गणपती, सूर्य, शक्ती (देवी) वगैरे इतर देवतांना त्यात स्थान मिळाले. प्रथम उत्तर भारतात भक्तीपंथाचा उगम झाला. नंतर त्याचा दक्षिण भारतात प्रसार झाला.

शैव, वैष्णव, शक्ती इ. वैदिक धर्मांतर्गत भक्तीपंथाची सुरूवात मौर्यपूर्व काळात झाली. साध्या सोप्याचा आचार व विचारामुळे बहुजन समाज बौध्द व जैन धर्माकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊ लागला असता या वर्गाला पुन्हा वैदिक धर्माकडे खेचून आणण्याचे कार्य या भक्ति संप्रदायाने केले. ईश्वर प्राप्तीचे तत्वज्ञान वेद, उपनिषदे व षडदर्शन आदीमध्ये संस्कृत भाषेत सांगितले होते. परंतु संस्कृत शिकण्याचा अधिकार बहुजनांना नसल्याने त्यांना संस्कृत भाषा अवगत नव्हती. त्यामुळे वैदिक धर्मातील सर्वश्रेष्ठ ब्रह्म, आत्मा, माया, विषमता, लिंगभेद, अंधश्रध्दा, जातिभेद व अंधश्रध्देमुळे पोखरला होता. अशा कठीण परिस्थितीत भारतात भक्तिसंप्रदायाचा उदय झाला. भक्ती संप्रदायाच्या उदयाचे उदिष्ट ईश्वराची आराधना करणे हे जरी एक असले तरी भारतात विभिन्न प्रदेशात वेगवेगळ्या कालखंडात भक्ती संप्रदाय उदयास आले.

संप्रदाय संकल्पना- प्राचीन काळापासून भारतात वैदिक व अवैदिक धर्मसंप्रदाय निर्माण झाले. सांप्रदायिक अधिकारी पुरूषांनी त्या त्या संप्रदायाचे तत्वज्ञान, आचार, तसचे महापुरूषांची चरित्रे, परमार्थपर ग्रंथ लेखन केले आहे. मानवी जीवन सुखी, समृध्द, शांत, भक्तीपूर्ण होण्यासाठी उदयास आलेल्या सर्व संप्रदायांनी प्रयत्न केले. समाजातील अज्ञानी लोकांना ज्ञान प्राप्त होण्यासाठी त्यांनी विविध मार्ग दाखविले. पारमार्थिक अनुभवांचा साठा किंवा ज्ञान आणि ते प्राप्त करून उपभोगण्याचा साधन मार्ग या अर्थाने संप्रदाय हा शब्द पुढे आला.[1] ज्ञानाने जीवाचे स्वरूप व त्याचे पारमार्थिक ध्येय ठरते. ध्येय अगर साफल्य ठरल्यावर त्या ध्येयाचा अगर साफल्याचा मार्ग कोणता, ते ध्येय साध्य होण्यास्तव जीवाने कसे वागावे, आयुष्यक्रम कसा आखावा, कोणत्या गोष्टी स्वीकाराव्यात, कोणत्या गोष्टी टाळाव्यात, कोणात्या गोष्टींच्या विकसनार्थ झटावे, आपल्या दैनंदिन जीवनात खाणे, पिणे, बोलणे, चालणे याबाबत कोणते निर्बंध पाळावेत इत्यादी गोष्टींबद्दल प्रश्न उत्पन्न होतात. त्यावरून व्यक्तीने आपले पारमार्थिक कल्याण कसे साधवे याची रीत ठरविली जाते. या रितीलाच संप्रदाय हे नाव आहे. साधन मार्गाचे संरक्षण, संवर्धन आणि एका पिढीकडून दुसऱ्या पिढीत श्रध्दा, विकास, आचार, तत्वज्ञान, उपासना, स्थाने विभूती, देवता यासह होणारे संक्रमण आणि त्यातून आकारास येणारी एक विशिष्ट परंपरा म्हणजेच व्यापक अर्थाने संप्रदाय होय.

मानवी जीवन सुखी, समृध्द, शांत, भक्तिपूर्ण होण्यासाठी सर्व संप्रदायांनी प्रयत्न केला. समाजातील अज्ञानी लोकांना ज्ञान प्राप्त होण्यासाठी त्यांनी विविध मार्ग दाखविले. संप्रदाय व पंथ दोन्ही शब्द एकाच अर्थाने



S.P. Mahavidyalaya, Bhoom Bhoom Tq.Bhoom Dist.O.bad

ISSN : 2278-9308
June 2020

वापरले जातात. तरीही 'संप्रदाय' शब्दावरून परंपरा सुचित होते. संप्रदाय व पंथ शब्दाच्या विवेचना बाबत श्री. भा. पं. बहिरट लिहितात, "दैवी अनुभूती संपन्न अशा एखाद्या पुरुषापासून परंपरा सुरु होते. त्यास 'संप्रदाय' म्हणता येते. ही अनुभूती मानवी जीवनाथ प्रत्येकास घेता आली पाहिजे. या तळमळीने काही विशिष्ट साधनेची रूपरेषा संप्रदाय प्रवर्तकाकडून निश्चित केली जाते. अनुभूतीतून ध्येयाकडे नेण्याचा मार्गक्रमच आखलेला असतो. त्या मार्गक्रमास 'पंथ' हे नाव लागू पडते. संप्रदाय व पंथ ही नावे अर्थात दोन भिन्न पदार्थ दाखवित नसून, एकाच वस्तूची दोन रूपे होत. एकाच प्रवाहाच्या दोन बाजू होत."[2] सामान्यत: पंथ व संप्रदाय म्हणजे एकच होय, असे मानण्याचा सर्वसामान्य लोकांचा विचार असतो.

**नाथ संप्रदायाचा उदय-** नाथ संप्रदाय हा अतिप्राचीन अनादि आहे. नाथ शब्दात न + आथ= नाथ अशी संधी आहे. ज्याला आरंभ नाही, म्हणजेच तो अनादि आहे, तो 'नाथ' संप्रदाय आहे. नाथ म्हणजेच स्वामी, नाथ, परमेश्वर अशी संप्रदायाची संकल्पना आहे. या संपप्रदायाची शंकर किंवा आदिनाथ याने स्थापना केल्याचे मानले जाते. शिव हा आदर्शसंन्याशी. शैव पंथामध्ये अनेक संप्रदाय निर्माण झाले. त्यापैकी सर्वाधिक महत्वाचा हा पशुपती शैव संप्रदाय होता. दक्षिण भारतात लकुलिसा हा या संप्रदायाचा मूळ गुरु आहे.[3] या संप्रदायातूनच नाथपंथाचा दहाव्या शतकाच्या सुमारास उदय झाला. या संप्रदायाचे आद्यपुरूष म्हणून मच्छिंद्रनाथाला ओळखले जाते. ते दहाव्या शतकात होऊन गेले. नाथ म्हणून मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, जालिंदरनाथ, कानिफनाथ, गहिनीनाथ, चर्पटीनाथ, भर्तरीनाथ, रेवणनाथ व नागनाथ हे एकंदरीत नऊ नाथ होऊन गेले. रा. चिं. ढेरे यांच्या मते दक्षिण भारतातील श्रीशैल परिसरात मद्य, मांस भक्षण, वेश्यागमन असा वामचार वाढलेला होता. हा वामाचार नष्ट करण्यासाठी वैराग्य व त्याग या गुणांनी युक्त अशा नाथ संप्रदायाची गोरक्षनाथांनी श्रीशैल कर्दलीवन भागात स्थापन केली.[4] नंतर या पंथाचा पश्चिम व मध्य महाराष्ट्रात गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृतीनाथ यांनी प्रचार केला. प्रचार कार्य करत करत नाशिक, त्र्यंबकेश्वर, परिसरात समाधिस्त झाले.

दक्षिण महाराष्ट्रात मत्सेंद्रनाथनी नाथ संप्रदायाचा प्रचार केला. त्यांची समाधी सातारा जिल्ह्यात मच्छिंद्र गडावर आहे. गहिनीनाथ, निवृतीनाथ, ज्ञानदेव यांनी नेवासे, पंढरपूर भागात नाथ संप्रदायाचे विचार रुजवले. संत ज्ञानेश्वरांनी आळंदी येथे समाधी घेतली. विदर्भात अमरनाथ, हरिनाथ, रघुनाथ, मुकूंदराज यांनी नाथ पंथाचा प्रचार केला व शेवटी या परिसरातच भंडाऱ्याजवळ वैनगंगेच्या तीरावर मनोहर अंबानगरी (अंभोरे) परिसरात समाधी घेतल्या. चक्रधरस्वामीचे गुरू श्री. गोविंदप्रभू, आजे गुरू चांगदेव राऊळ हे नाथ संप्रदायाचे अनुयायी होते.[5] तेराव्या व चौदाव्या शतकात रत्नगिरी जिल्ह्यातील पन्हाळे काझी हे नाथ पंथाचे प्रमुख केंद्र होते. हे येथील लेणी पाहिल्यानंतर लक्षात येते. नाथपंथीयांनी पन्हाळे काझी येथे लेणे क्र. 29 व लेणे क्र. 14 व 21 स्वत:करिता सोईचे करून घेतले. यादवकाळात अंबाजोगाई येथे नाथपंथाचे एक केंद्र होते. तसेच उस्मानाबाद जिल्ह्यातील सोनारी (ता. परांडा) येथे नाथपंथी भैरवनाथ मठाची स्थापना यादवकाळातच झाली. नाथ संप्रदाय हा योगाधिष्ठित संप्रदाय आहे. आदिनाथ शिव महान योगी असून मत्सेंद्र, गोरक्ष हे योगी होते. योग आणि त्यागाला या संप्रदायात अत्यंत महत्व आहे. प्रारंभकाळी योगाचारावर फार भर दिला जात होता. कालांतराने योगाचरणाचे महत्व कमी होऊन, बाह्यचाराला महत्व प्राप्त झाले. त्याचाच परिणाम स्वरूप संप्रदायात कानफाटे, अवधूत, जोगी पोटभेद निर्माण झाले.[6] या संप्रदायाचा भारतात तसेच तिबेट, अफगाणिस्तान, खोरासान, नेपाळ इत्यादी देशात प्रसार झाला.

**नाथ संप्रदायाची वेशभूषा आणि आचार-** नाथ संप्रदायाची वेशभूषा शिवासारखी असते. बाह्य वेशावरून नाथ सांप्रदायिकांना सहज ओळखता येते. कर्णकुंडल, धंधारी (लोखंडी किंवा लाकडी पट्ट्यांचे चक्र), रूद्राक्षमाला (रूद्राक्षांच्या माळा), किंकरी (हे सारंगीसारखे वाद्य), मेखला (लोकरीची दोरी), जानवे, शृंगी (हरिणीच्या


S.P. Mahavidyalaya, Bhoom Tq.Bhoom Dist.O'bad

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Issue No,235
ISSN : 2278-9308
June 2020

शिंगापासून बनवलेली शिट्टी), कंथा (भगव्या रंगाचे वस्त्र), दंडा (दीड हात लांबीची काठी), खपरी (फुटक्या मडक्याच्या तुकड्याला खापरी म्हणतात) आणि आधारी (हे आसनपीठ असून लाकडी दांडक्याला खालीवर पाटासारख्या फळ्या बसवून तयार केलेले असते.) ही नाथ संप्रदायाची वेशभूषा होय. अंगाला विभूती लावणे, खांद्यावर व्याघ्रांबर घेणे, पायात पावरी घालणे आणि काखेत खापर घेणे हा नाथ संप्रदायाचा सुरुवातीपासून वेश होय. डॉ. ढेरे यांनी या वेशाचे प्राचीनत्व 'लिळाचरित्रातील' नाथयोग्यांच्या वेशांचे उल्लेख आधाराला घेवून सिध्द केले आहे.[7] 'सिध्दसिध्दान्त पध्दती' या प्रमाण ग्रंथात विभूती, कौपीन, खप्पर, शंख, पादुका, मृगत्वचा, मेखला, कुंडले, जपमाला, दंड, योगपट्ट असे या वेशभूषेचे आध्यात्मिक वर्णन केले आहे.[8] संप्रदायात शिष्यत्व स्वीकारण्याच्या अगोर 40 दिवस 'गुरु' शिष्याची परीक्षा घेतो. या परीक्षेमध्ये शिष्य उत्तीर्ण झाल्यावर त्यांचे केस कापून, योगीवस्त्र देवून नाथ संप्रदायाची दिक्षा दिली जाते.

जीवनातील सफलता साध्य करण्यासाठी साधना महत्त्वाची असून, साधनेसाठी अनुकूल असा आचार असावा लागतो. योगप्रधान नाथ संप्रदायात विशिष्ट आचाराला प्राधान्य दिले जाते. धर्मसंमत व शिष्टसंमत अशा वर्तनाला आचार म्हणतात. डॉ. प्र. न. जोशी म्हणतात, "कोणत्याही धर्माचे वा धर्मतत्वाचे तत्व निगूढ अशा गुहेत असले तरी आचार हे त्याचे एक प्रधान अंग असते"[9] नाथ संप्रदाय शिवोपासक संप्रदाय असल्याने व शिव योगमार्गाचा प्रवर्तक असल्यामुळे या संप्रदायात योगाचाराला फारच महत्त्व आहे. माणसाच्या चंचल मनाला स्थिर करण्यासाठी, एकाग्र करण्यासाठी योगात उपाय, साधना सांगितलेली आहे. शुध्द योगमार्गाने अनुभवायचे निर्गुण-निराकार परमात्म तत्व, त्यासाठी करावी लागणारी योगसाधना आणि योगीयाने आचारावयाचे उच्च नैतिक आचार या तिन्ही गोष्टींचा सुरेख संगम गोरक्षनाथांच्या वाणीतून त्यांच्या 'सबदीत' झालेला आहे.[10] या संप्रदायात शिष्याने शुध्दाचरणाचाच जीवनात अंगिकार करावा. या संप्रदायाच्या साधनापध्दतीत 'रहनी' आणि 'करनी' असे दोन विभाग आहेत.[11] 'रहनी' म्हणजे नैतिक आचरण आणि 'करणी' म्हणजे कायायोग होय. नाथ संप्रादायात इंद्रियनिग्रहावर विशेष भर दिला आहे. या संप्रदायात अतिआहार नसावा असे म्हटले आहे. 12 ज्योतिर्लिंगांच्या यात्रा करणे, 'अलख निरंजन', 'आदेश', असा पुकारा करणे इ. आचरणाचे अविभाज्य अंग मानलेले आहेत. याशिवाय शियमहात्मपर, नाथमहात्मपर ग्रंथाची पारायणे करणे, ब्रह्मचर्याचे पालन करणे, चटईवर झोपणे, धूप जाळावा, आरती करावी, नंददीप तेवत ठेवणे इत्यादी आचरणावर भर दिल्याचा दिसतो.

**नाथ संप्रदाय तत्वज्ञान-** प्रत्येक संप्रदायाचा 'जीव' जगत व 'ईश्वर' यांचेकडे पाहण्याचा दृष्टीकोन लक्षात घेतला म्हणजे त्या तया पंथाचे तत्वज्ञान समजते. शिव आणि शक्ती यांच्यातील सामरस्याच्या सिध्दान्तावर नाथ संप्रदायाचा प्रमुख भर आहे. गोरक्षनाथांनी आपल्या ग्रंथात परमात्मा, जगत व जीव यांच्या स्वरूपाचे विवेचन केले आहे. या तत्वज्ञानाच्या मते जीव आणि जगत यांच्यातील एकात्मता हेच साधकाच्या जीवनाचे परमोच्च ध्येय आहे.[12] शक्तीयुक्त शिव हे अंतिम सत्य असून या सत्याचे स्वरूप अविनाशी व अनंत आहे. प्रत्येकाला साधनेच्याद्वारे सत्याचा अनुभव घेता येतो. शिवाच्या अंतरात असलेली शक्ती ही जगाच्या उत्पत्ती, स्थिती व लयास कारणीभूत आहे. या जगातील जीव हे ब्रह्मांड ज्या प्रक्रियने बनले आहे त्याच प्रक्रियेने बनलेले आहे. ब्रह्मांडात जे काही आहे ते सर्व पिंडात (जीवांत) आहे. ब्रह्मांडाची पिंड ही छोटी आवृत्ती आहे. शिव हाच विश्वाचा व जीवांचा खरा आत्मा आहे. म्हणून जीव व जगत यांच्या अंतर्यामी असणाऱ्या शिवाशी ऐक्यतेचा अनुभव घेणे हे मानवाचे ध्येय असले पाहिजे. यासाठी मार्गदर्शक गुरूची सेवा करून साधना करावी.

**नाथ संप्रदायाचे योगदान-कार्य -** मध्ययुगीन कालखंडात उत्कर्षाच्या शिखरावर पोहोचलेल्या व लोकप्रिय ठरलेल्या नाथसंप्रदायाला पुढील काळात आपली ही परंपरा टिकवता आली नाही. पुढील काळात हा संप्रदाय क्षीण होत गेला. याला दोन कारणे कारणीभूत असावीत. एक म्हणजे बाह्याचारांवर पुढे पुढे फार भर दिला



S.P.Mahavidyalaya,Bhoom Bhoom Dist.O.bad Tq.Bhoom

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Issue No,235
ISSN : 2278-9308
June 2020

गेल्यामुळे मूळ शुध्द योगाभ्यास मागे पडून सांप्रदायिकांमध्ये विकृती उत्पन्न झाली आणि दुसरे म्हणजे वारकरी संप्रदायाचा उदय व सोपी शिकवण त्यामुळे बहुजन समाज नाथसंप्रदयाकडून वारकरी संप्रदायाकडे आकर्षित झाला असावा. असे असले तरी या संप्रदयाने केलेले कार्य उल्लेखनीय आहे. ज्या कालखंडात नाथ संप्रदाय उदयाला आला त्या कालखंडाच्या पार्श्वभूमीवर नाथसंप्रदायाची कामगिरी अभ्यासणे महत्वाचे आहे. ९व्या शतकानंतर भारतात सर्वत्र राजकीय अस्थिरता असताना, लहान-लहान राज्याचा संघर्ष असताना, वैदिक कर्मकांडाचा पगडा असताना सर्वसामान्यांमध्ये एकात्मता स्थापन करून सामान्य माणसाचे दिशादर्शन करण्याचे कार्य नाथसंप्रदायाने केले.[13] नाथसंप्रदायाने धार्मिक कर्मठपणाला दूर सारून सर्वांना संप्रदायात मुक्त प्रवेश दिला. नाथसंप्रदायाने समतेचे धोरण राबवून समाजातील स्त्रियांचे स्थान उंचावण्याचा प्रयत्न केला.[14] तपस्विनी मुक्ताबाई, मैनावती, गंगाबाई राशिनकर, हाडा इत्यादी स्त्रियांना नाथसंप्रदायाने आपले द्वार उघडे ठेवले होते. अस्पृश्यापासून ब्राह्मणापर्यंत स्त्री-पुरुष सर्वांना या संप्रदायात समान स्थान होते. शिवाय चारही वर्णातील भिक्षा नाथसंप्रदायी स्विकारीत असत. नाथ संप्रदायाने आपले तत्वज्ञान मांडण्यासाठी प्राधान्याने प्रादेशिक भाषांचा वापर केला. आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी लिहितात, "भक्ती आंदोलनाच्या प्रारंभी नाथसंप्रदायाचे आंदोलन महत्त्वपूर्ण ठरले. आधुनिक भाषांची रचना करण्यात नाथसंप्रदायाचे योगनाथ उल्लेखनीय आहे. आधुनिक भारतीय भाषांच्या उगमाच्या संदर्भात व वाङ्मयीन दृष्ट्या त्या त्या भाषांची रचना करण्यात नाथसंप्रदायाचे योगदान उल्लेखनीय आहे. आधुनिक भारतीय भाषांचा वाङ्मयीन दृष्ट्या अभ्यास करत असताना नाथ संप्रदायाच्या अभ्यासाविना तो अपूर्ण राहिल"[15] 'गोरखवानी' हा ग्रंथ हिंदीतील आद्यग्रंथ मानला जातो. नाथसंप्रदायी साधकांनी आपले विचार मांडण्यासाठी बंगाली, तेलगू, मराठी अशा विविध भाषांचा वापर केला. यामुळे नाथसंप्रदायाचा सामाजिक पाया विस्तृत होऊ शकला.

तत्कालीन कालखंडात तत्वज्ञानाच्या दृष्टीने द्वैत आणि अद्वैत यांविषयी विविध मते निर्माण होऊन विविध तट पडले असताना नाथसंप्रदायाने आपल्या समन्वयी दृष्टीने आपले शांभवाद्वैती तथा ईश्वराद्वैती तत्वज्ञान निरूपले आणि मतामतांच्या गलबत्यातून पारमार्थिकांना बाहेर काढले.[16] या संप्रदायाने गुरूलाच ईश्वर मानून आपल्या अंतकरणातील अनिवार भक्तिप्रेमाचा वर्षाव गुरूच्या ठिकाणी केला. हाच भक्तीचा धागा गहिनीनाथांनी निरूपलेल्या कृष्णभक्तीभोवती गुंफला जावून महाराष्ट्रात विठ्ठलाच्या रूपाने हरिहरैक्य रूप पावला. या संप्रदायाने हिंदू आणि मुसलमान असा भेदभाव न करता आपल्या संप्रदायात सामाविष्ट करून हिंदू-मुसलमान विरोधाची धार बोथट करण्याचा प्रयत्न केला. नाथ संप्रदायाच्या कामगिरीमुळे तांत्रिक बौध्दांचा प्रभाव लुप्त झाला. पुढे नाथसंप्रदायामध्येही अनेक विकृत आचार शिरले. नाथसंप्रदाय अनेक उपपंथात विभाजित झाला. कालांतराने नाथसंप्रदायाच्या अनुयांयामधूनच पुढे वारकरी संप्रदाय, वीरशैव संप्रदाय, महानुभव संप्रदाय इत्यादी संप्रदायाचा उदय झाला.

संदर्भ सूची :

1) कदम विकास- वारकरी संप्रदयाचा इतिहास आणि पंढरपुरातील सांप्रदायिक फड व मठांचे कार्य, अरुणा प्रकाशन, लातूर प्रथम आवृत्ती 2014, पृ.क्र.19
2) डॉ. बी. एन. पाटील- प्राचीन महाराष्ट्र वाङ्मय वैभव, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती- 17 ऑक्टोबर 2009, पृ.क्र. 125
3) डॉ. अलीम वकील- एका पथावरील दोन पंथ : भक्ती आणि सूफी, प्रतिमा प्रकाशन पूणे, प्रथमावृत्ती- मे 2012, पृ.क्र. 311
4) रा. चिं. ढेरे- नाथ संप्रदायाचा इतिहास, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, 20 डिसेंबर 2010 पृ.क्र. 18

S.P. Mahavidyalaya, Bhoom Tq.Bhoom Dist.O.bad

5) डॉ. दीपा सावळे, डॉ. घनश्याम महाडीक, डॉ. किशोरकुमार गव्हाणे- दिल्ली सल्तनतचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती-2014, पृ.क्र. 209
6) डॉ. बी. एन. पाटील- पुर्वोक्त पृ.क्र. 137
7) रा. चिं. ढेरे- श्रीगुरू गोरक्षनाथ : चरित्र आणि परंपरा, वोरा अँड कंपनी मुंबई, आवृत्ती-1959, पृ.क्र. 44-45
8) डॉ. कल्याणी मलिक (संपा.)- सिध्दसिध्दान्त पध्दती, पूना ओरिएंटल बुक हाऊस, आवृत्ती 1954
9) डॉ. प्र. न. जोशी- नाथसंप्रदाय, राजीव प्रकाशन, ठाणे, आवृत्ती-1977, पृ.क्र. 74
10) डॉ. पीताम्बरदत्त बडथ्वाल (संपा.)- गोरखबानी, हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग, आवृत्ती-19423 सं.2097
11) रा.चि. ढेरे- पूर्वोक्त, पृ.क्र. 186
12) डॉ. अत्रे, प्रा. रायरीकर, कँजळे- महाराष्ट्र संस्कृती ; 1918 पर्यंत, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, दुसरी आवृत्ती-मार्च 2011 पृ.क्र. 163
13) किता
14) डॉ. दीपा सावळे, डॉ. घनश्याम महाडीक, डॉ. किशोरकुमार गव्हाणे- पुर्वोक्त पृ.क्र. 211
15) डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी- नाथ संप्रदाय, हिंदुस्थानी अँकेडमी, उत्तर प्रदेश-अलाहाबाद, आवृत्ती-1950
16) र. रा. गोसावी- पाच भक्तिसंप्रदाय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती-15 ऑगस्ट 2008, पृ.क्र. 91

Mahavidyalaya, Bhoom Dist.